निधन,राजीनामा,अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतींतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम..

निवडणूक प्राथम्य
ई-मेलद्वारे

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. ०१/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०८/११/२०२१

जिल्हाधिकारी *(सर्व),*
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून)*

**विषय :- निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतीतील रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूकांकरीता पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम..**

संदर्भ :-१. राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांकाचे दिनांक ०५/०२/२०२१ चे मतदार यादी कार्यक्रम आदेश.
२.मा. सर्वोच्च न्यायालयाचे दिनांक ०४ मार्च २०२१ चे आदेश तसेच सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३, दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) केलेली सुधारणा.
३. आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ०३/११/२०२१ चे पत्र.

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

२. **राज्यात उद्भवलेली कोरोना परिस्थिती व शासनाने वेळोवेळी घातलेले निर्बंध यामुळे निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे ग्रामपंचायतींमध्ये रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूका घेता आल्या नाही. आता कोरोनाच्या अनुषंगाने आटोक्यात आलेली परिस्थिती विचारात घेता या पोटनिवडणुका घेणे आवश्यक आहे.**

३. मुख्य निवडणूक अधिकारी,महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०१/०१/२०२२ या अर्हता दिनांकांवर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम दिलेला असून या कार्यकमानुसार दिनांक ०१/११/२०२१ रोजी प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

संदर्भ क्र.१ अन्वये या पोटनिवडणुका घेण्यासाठी आयोगाच्या दिनांक ०२ फेब्रुवारी २०२१ च्या अधिसूचनेन्वये व दिनांक ०५/०२/२०२१ च्या शुध्दीपत्रकान्वये शुक्रवार दिनांक १५/०१/२०२१ हा मतदार यादी ग्राहय धरुन मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात आला होता. मात्र संबधित ठिकाणी प्रत्यक्ष निवडणूकांचा कार्यक्रम राबविण्यात आलेला नाही.

४. सबब यासंदर्भात खालीलप्रमाणे नव्याने आदेश देण्यात येत आहेत :-

**आदेश**

३. संदर्भ क्र.१ अन्वये राबविण्यात आलेला मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे.

४. या रिक्त पदांच्या पोट निवडणुकांसाठी पारंपारिक पध्दतीने मुद्दा क्र. ४ नुसार प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

३. मतदार यादी कार्यक्रमाची व्याप्ती -

निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे इतर ग्रामपंचायतीतील रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांकरीता दिनांक ०१/११/२०२१ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी वापरण्यात यावी.

सबब, खालील बाबींची पूर्तता करणाऱ्या ग्रामपंचायतींमधील रिक्त झालेल्या पदांसाठी पारंपारिक पध्दतीने मतदार यादी कार्यक्रम राबविण्यात यावा.

१. ज्या ग्रामपंचायतीमध्ये कोरोना ॲक्टीव्ह रुग्ण संख्या नगण्य आहे.

२.ज्या ग्रामपंचायतीची मुदत संपण्यास सहा महिन्याचा पेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे.

संदर्भ क्र. ३ येथील दिनांक ०३/११/२०२१ च्या पत्रात नमूद केल्यानुसार **रिक्त पदांच्या पोटनिवडणूका घेण्यासाठी दिनांक ३१/१०/२०२१ पर्यंत रिक्त झालेल्या पदांचा समावेश करण्यात यावा.**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमच्या कलम ११ (३) मधील तरतुदीनुसार ज्या ग्रामपंचायतींची मुदत समाप्त होण्यास ६ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे व या कालावधीत पद रिक्त झाले आहे, अशा रिक्त पदांचा समावेश करण्यात येऊ नये.

४. मतदार यादीचे प्रभागनिहाय विभाजन करण्याचा कार्यक्रम पारंपारिक पध्दतीने खालीलप्रमाणे राबविण्यात यावा.

| | | |
|---|---|---|
| **मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक** | **सोमवार** | **दि.०१/११/२०२१** |
| २) प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | शुक्रवार | दिनांक १२/११/२०२१ |
| २) हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | शुक्रवार<br>मंगळवार | दिनांक १२/११/२०२१ ते<br>दिनांक १६/११/२०२१ पर्यंत |
| ३) प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे | गुरुवार | दि.१८/११/२०२१ |

५. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे -**

प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी.

अ) विधानसभा मतदार यादीत संबंधित ग्रामपंचायतींचा समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या अधिक त्या ग्रामपंचायतींसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील

मतदारांची एकूण संख्या समान आहे (म्हणजेच संबंधित ग्रामपंचायतींतील विधानसभेच्या मतदार यादीत समाविष्ट असलेले सर्व मतदार त्या ग्रामपंचायतींच्या सर्व प्रभागांसाठीच्या प्रारुप मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत तसेच, संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीबाहेरील मतदार त्यामध्ये समाविष्ट झाले नाहीत) याची खात्री करावी.

आ) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाच्या आदेश क्र. मनपा/रानिआ२००७/ प्र.क्र.०६/ का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

इ) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाच्या आदेश क्रमांक - रानिआ/ मनपा-२०१०/प्र.क्र.४/का-५, दि. ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

ई) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरूस्ती व पत्त्यांमधील दुरूस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही, याची कृपया नोंद घ्यावी. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दि.१७/०४/२०१५ चे आदेश)

**६. प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे.**

प्रारूप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार/नागरीकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रारुप मतदार यादीला दि.१२/११/२०२१ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी .

**७. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे.**

७.१ दि.१२/११/२०२१ ते दि.१६/११/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करून प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांवर फक्त पुढीलप्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करता येईल:-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील चुकून अंतर्भूत झालेले मतदार

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे असूनही ग्रामपंचायतीच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे ग्रामपंचायतींच्या प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करणे.

७.२ सदर मतदार यादी कार्यक्रमानुसार विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर वरीलप्रमाणे विचार करून त्यानुसार आवश्यक त्याच सुधारणा मतदार यादीत कराव्यात ,जेणेकरून पुढील काळात याबाबत न्यायालयीन प्रकरणे उद्भवणार नाहीत.

८. **प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे:**

अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करून त्याबाबतची सूचना दिनांक १८/११/२०२१ रोजी मुद्दा क्र.९ मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

९. **प्रारूप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-**

अ) ग्रामपंचायत, तलाठी सजा, मंडळ अधिकारी, पंचायत समिती व तहसिल कार्यालयातील सूचना फलकावर

ब) स्थानिक वृत्तपत्रे

क) स्थानिक केबल टि. व्ही.

१०. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या **मतदार यादीचे ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.** (संदर्भ: शासनाच्या महसूल व वन विभागाचे दि.२४/०४/२०१७ रोजीचे परिपत्रक)

११. मतदार यादीचा कार्यक्रम सुरू झाल्यानंतर एखादया ग्रामपंचायतींबाबत न्यायालयाने अथवा अनर्हते **विरोधातील अपिलासंदर्भात संबंधित विभागीय आयुक्त यांचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास** त्या ठिकाणचा मतदार यादी कार्यक्रम रद्द करून त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने आयोगास तात्काळ सादर करावा.

१२. मतदार यादी कार्यक्रमाच्या टप्प्यावर प्रत्यक्ष निवडणुकीच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्ह्याच्या मुख्य **कार्यकारी अधिकारी व इतर यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करावी व त्याचा अहवाल तत्परतेने आयोगास ई-मेलद्वारेच सादर करण्यात यावा.** आपल्या कामाचा काढावा मा. आयुक्त यांच्याकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे वेळोवेळी घेण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी.

१३. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१४. **सदर प्रभागनिहाय मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाने निर्धारीत केलेल्या कालावधीत पूर्ण होईल, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.**

१५. **प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द झालयानंतर खालील अहवाल राज्य निवडणूक आयोगाकडे** दिनांक १५/११/२०२१ पर्यंत न चुकता सादर करण्यात यावेत :-

- **ज्या रिक्त पदांचा पोटनिवडणूक कार्यक्रमात समावेश केला त्या ग्रामपंचायतीचे नाव, प्रभाग क्रमांक, जागा आणि प्रवर्ग**

- **सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३, दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) मध्ये केलेल्या सुधारणेनुसार ज्या ग्रामपंचायतींमधील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या एकत्रित आरक्षणामध्ये नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाचे आरक्षण मिळविल्यानंतर एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, अश्या ग्रामपंचायतींचा तपशिल**

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सोबत: परिशिष्ट**

**प्रत**:-१. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

वरील मतदार यादी कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायतींबाबत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून आपणास अहवाल प्राप्त होताच या ग्रामपंचायतींसाठी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ते अनुदान तात्काळ वितरित करण्याची व्यवस्था करावी.

२. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

३. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.

४. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आवश्यक कार्यवाहीसाठी

५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).

**मतदार यादी कार्यक्रमासंदर्भात वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती प्रमाणित करून उपलब्ध करून देण्याचे तसेच जिल्हा व तालुक्याच्या महसूल प्रशासनाशी वेळोवेळी समन्वय साधण्याचे निर्देश उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांना देण्यात यावे व या निर्देशांचे त्यांच्याकडून काटेकोरपणे पालन केले जाईल, याची दक्षता घ्यावी.**

६. संगणकीकरण शाखा, राज्य निवडणूक आयोग, यांना माहिती व उचित कार्यवाहीसाठी.

७. कक्ष अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना मतदान साहित्याच्या उपलब्धतेसंदर्भात पुढील उचित कार्यवाहीसाठी.

८. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग यांना उचित कार्यवाहीसाठी.

९. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.

१०. निवड नस्ती.

(परिशिष्ट)

*आयोगाचे क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.०१/का-८,दि. ०८/११/२०२१ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र.*

**ग्रामपंचायतींच्या पोटनिवडणूकांसाठी पारंपारिक पध्दतीने राबविण्यात यावयाचा मतदार यादीचा कार्यक्रम..**

## मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक ०१/११/२०२१

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरू करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय **प्रारूप मतदार यादी** प्रसिध्द करण्याचा दिनांक | शुक्रवार दिनांक १२/११/२०२१ |
| २ | हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | शुक्रवार दिनांक १२/११/२०२१ ते<br>मंगळवार दिनांक १६/११/२०२१ पर्यंत |
| ३ | प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिध्द करणे. | गुरुवार दिनांक १८/११/२०२१ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र